राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई
आवक क्र. २१८
दिनांक ०९/०१/२०१५
आवक लिपिक स्वाक्षरी
प्रतीक स्वाक्षरी
12/01/15

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचातील सदस्यांच्या मानधनात वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१३/३४०/प्र.क्र. ८८/ ग्रासं.-४
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १५ डिसेंबर,२०१४

**प्रस्तावना:**

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचातील सदस्यांच्या मानधनवाढीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असताना, जनहित याचिका क्र. १५६/२०११ मध्ये मा. उच्च न्यायालयाने देशातील ग्राहक संरक्षण विभागाचे मंत्री, राज्य आयोगाचे अध्यक्ष इत्यादींची नवी दिल्ली येथे दिनांक १५ मार्च, २०१२ रोजी झालेल्या परिषदेमध्ये मानधन /वेतनाबाबत ठराव पारित करण्यात आला. त्या ठरावानुसार सदस्यांना अंतिम व अंतरिम निर्णय घेण्याचे आदेश दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ रोजी दिलेले होते. त्यानुसार पुर्णकालिन सदस्यांना हरियाणा राज्यात देय असलेल्या मानधनाप्रमाणे व अंशकालिन सदस्यांना डॉ. पी. डी. शेनॉय समितीने शिफारस केल्याप्रमाणे मानधन /प्रवासभत्ता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

Mr. Bralmankar

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचातील पूर्णकालिन सदस्यांना हरियाणा राज्याप्रमाणे तर अंशकालिन सदस्यांना डॉ. पी. डी. शेनॉय समितीने शिफारस केल्यानुसार खालीलप्रमाणे मानधन व वाहन भत्ता देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

(अ) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग:-

(१) पूर्णकालीन सदस्यांना रु. ४०,०००/- प्रति महिना मानधन देण्यात यावे
(२) अंशकालीन सदस्यांना प्रति दिन प्रति बैठक रु. १०००/- मानधन व रु.३००/- वाहनभत्ता देण्यात यावा.

(ब) जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच :-

(१) पूर्णकालीन सदस्यांना प्रति महिना रु. २०,०००/- मानधन देण्यात यावे.

(२) अंशकालीन सदस्यांना प्रतिदिन प्रति बैठक रु. ६००/-मानधन व रु.१५०/- वाहन भत्ता देण्यात यावा.

२. पूर्णकालिन /अंशकालिन सदस्य ज्या तत्वावर मानधन घेत आहेत, त्यानुसारच संबंधितांना वरील मानधन व वाहनभत्त्यात वाढ अनुज्ञेय राहील.

३. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. शिकाना ३४७, दि. १५.१२.२०१४ नुसार दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(उ. द. चालुंज)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा /विधानपरिषद
सर्व विधानसभा सदस्य /विधानपरिषद
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई /नागपूर.
प्रबंधक, उच्च न्यायालय,मुंबई.
प्रबंधक,राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई .
प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच,( सर्व )
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व उप सचिव /अवर सचिव /कार्यासन अधिकारी ,अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.